भाग ६

।। चिंतनक्षण ।।

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

।। चिंतनक्षण ।।

भाग : ६

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

*** चिंतनक्षण : भाग-६ ***

पुस्तकरूपाने प्रकाशित सातवी आवृत्ती : सप्टेंबर २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

आपल्या मनाचे लाडावलेल्या
मुलासारखे झाले आहे.त्यामुळे
कल्याणाचे होण्यापेक्षा मनासारखे
होण्याचीच चिंता जास्त लागते.१५१

‘मी गुरूंचा आहे’याचा सार्थ
अभिमान मला वाटण्याबरोबर
त्यांनाही वाटावा, यात
साधनेचे मर्म आहे.१५२

अहंकाराच्या त्याज्य लोढण्याला अनेक लोक उपयुक्त व गरजेचे शस्त्र समजतात ! १५३

मनाच्या ताब्यात राहणे आपल्याला वाटते एवढे अपरिहार्य नाही.[१५४]

वर्तमानाची प्रगतीला असलेली अनुकूलता लक्षात न येण्याने अपरिमित हानी होते.[१५५]

अनेक माणसे जगात न राहता स्वतःच्या जगात राहतात व आपलेच नुकसान करून घेतात.१५६

परिस्थिती आटोक्याबाहेर गेलेली उत्तम रीतीने पाहाता येणे हा, ती आटोक्यात आणण्याचा पहिला मार्ग आहे.[१५७]

मी बरोबर असतानाही मला समर्थनाची गरज वाटते, तेव्हा मी बहुधा बरोबर नसतो.[१५८]

दंभाचा प्रयत्नपूर्वक त्याग करणे ही मन:स्वास्थ्यावरची कडू, पण गुणकारी गोळी आहे.[१५९]

स्वार्थाच्या प्रेरणेला सावध
राहावे लागत नाही,
नि:स्वार्थी व्हायला मात्र
सावध राहावे लागते.१६०

मत्सराचे दास्यत्व व त्यामुळे येणारे दुःख नाहीसे व्हायला दुसऱ्यांविषयी सातत्याने शुभेच्छा बाळगणे, ही सोपी सुरुवात आहे.१६१

प्रपंचातल्या खऱ्या अडचणींचीसुद्धा
जे साधनेसाठी सबब करीत नाहीत
त्यांच्या साधनेतल्याच काय,
प्रपंचातल्या अडचणीसुद्धा भगवंत
काही सबब करून सोडवतो.१६२

ज्या डोळ्यांना दृश्य जगच पाहायचे असते त्यांना आरसा, गुरू, देव यांची फारशी गरज वाटत नाही. ज्या डोळ्यांना स्वतःला पाहायचे असते, त्यांना मात्र या गरजा असतात.१६३

लोकांना स्थूलातले पुरावे लागतात, म्हणून ज्याचे पुरावे सूक्ष्म असतात त्याचे ते देता येत नाहीत.[१६४]

मला काय मिळाले आहे
याची कल्पना आल्यास,
कल्याणासाठी त्याचे काय
करावे हे पुढे शिकता येईल. १६५

कर्मात व आपल्यात ज्याला
सदैव आवश्यक अंतर राखता
आले, त्याने साधले. १६६

आपले सर्व कौशल्य
प्रपंचाच्या कामी लागले आहे
म्हणून परमार्थात अपयशांचा
सुकाळ होतो.१६७

प्रतिमा मोडण्याचे धैर्य
दाखवले तर स्वरूप व
आनंदाइतके जवळचे
काही नाही.[१६८]

परमार्थातला प्रपंच जिंकता येणे हे नुसता प्रपंच जिंकण्यापेक्षा कठीण व जरुरीचे आहे.[१६९]

प्रगतीसाठी स्वत:च्या दोषांचे आकलन लागते, चिंतन नव्हे.[१७०]

सत्संग हाच परमार्थाचे रोप, पाणी व प्रकाश आहे.[१७१]

प्रयत्न करूनही प्रयत्नांचा आधार न वाटणे, ही प्रयत्नवाद व शरणागतीची सात्त्विक सांगड आहे. १७२

प्रामाणिकपणे पोटासाठी कष्टावे,
निष्कामपणे सेवेसाठी कष्टावे
आणि मग मात्र वेळ काढून
भगवंतासाठी 'स्व'स्थ असावे. १७३

असार ते धरून ठेवण्यानेच संघर्ष व दुःखे वाट्याला येतात.१७४

संत हे भगवंताचे माणसाला कळणारे एक स्वरूप होय.[१७५]

ऐहिकात, ऐहिकाच्या पलीकडे जाण्याची जी क्षमता आहे, तेच ऐहिकातले सुवर्ण आहे.[१७६]

न जमणाऱ्या
साधनप्रकाराचा आग्रह व
खंत हा साधनेतला
स्वनिर्मित अडथळा आहे.[१७७]

वाटेवरच्या थांब्यांना
मुक्कामाच्या जागा समजण्याने
भगवंताची प्राप्ती लांबते. १७८

जे दिसते ते दाखवायला डोळे व सूर्य पुरतात.पण जे दिसत नाही किंवा दिसूही शकत नाही, ते दाखवायला मात्र गुरू लागतो.१७९

‘साद’नाही
म्हणून ‘प्रसाद’ नाही.१८०

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यांसाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

* संतछाया, सातारा *